महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/सु.कें. ऑ. प्रशिक्षण/२०२०/४८२ दिनांक : 07 AUG 2020

परिपत्रक (इमेलव्दारे)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सुविधा केंद्रांना ऑनलाईन प्रशिक्षण देणेबाबत...**

संदर्भ : १. संचालनालयाचे आदेश क्रमांक : १०/ADM/२०२०-२१/F.C. & D.S. Year of Post SSC-FC/४७५, दिनांक : ३१.७.२०२०.
२. संचालनालयाचे आदेश क्रमांक : १०/ADM/२०२०-२१/ Post HSC-FC/४७६, दिनांक : ३१.७.२०२०.
३. संचालनालयाचे आदेश क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/FC/२०२०/४८७, दिनांक : ६.८.२०२०.
४. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/नोडल ऑफीसर/ पदविका/२०२०/४८४, दिनांक : ०६.०८.२०२०.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दिनांक १० ऑगस्ट, २०२० पासून सुरु होणार आहे. सदर प्रवेशप्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १, २ व ३ वरील कार्यालयीन आदेशान्वये, इयत्ता १० वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम व इयत्ता १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता सुविधा केंद्र (Facilitation Centre-FC) घोषित करण्यात आलेली आहेत. तसेच संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक ४ वरील पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सुविधा केंद्रांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी नोडल अधिकारी (Nodal Officer) नियुक्त करण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, उपरोक्त नमूद पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता घोषित करण्यात आलेल्या सुविधा केंद्रांचे (Facilitation Centre-FC) व नियुक्त करण्यात आलेल्या संबंधीत नोडल अधिकारी (Nodal Officer) यांचे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने गुगल मीटच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेले आहे. प्रशिक्षणापुर्वी संबंधीतांनी शासनाने मान्यता दिलेल्या प्रवेश नियमांचा अभ्यास करावा. सदर प्रशिक्षणाचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | वार व दिनांक | प्रशिक्षणाची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती / औरंगाबाद / मुंबई / नागपूर | इयत्ता १० वी नंतरचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | शनिवार ८.८.२०२० | सकाळी १०.०० ते दुपारी १.०० |
| २ | अमरावती / औरंगाबाद / मुंबई / नागपूर | इयत्ता १२ वी नंतरचे पदविका अभ्यासक्रम | शनिवार ८.८.२०२० | दुपारी २.०० ते सायं. ५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | नाशिक/ पुणे | इयत्ता १० वी नंतरचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | रविवार ९.८.२०२० | सकाळी १०.०० ते दुपारी १.०० |
| ४ | नाशिक/ पुणे | इयत्ता १२ वी नंतरचे पदविका अभ्यासक्रम | रविवार ९.८.२०२० | दुपारी २.०० ते सायं. ५.०० |

सदर प्रशिक्षणासाठीची Google Meet ची लिंक सुविधा केंद्र, नोडल अधिकारी व संबंधीत सहसंचालक यांना संबंधीत प्रवेश प्रक्रियेचे पोर्टलवर त्यांच्या लॉगइन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तरी सदर ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये सुविधा केंद्राचा एक मुख्य समन्वयक (Facilitation Centre-Chief Coordinator), नोडल अधिकारी (Nodal Officer) व संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी सहभागी व्हावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई तथा
सक्षम प्राधिकारी, पदविका अभ्यासक्रम

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र (Facilitation Centre-FC) संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन.
२. सर्व नोडल अधिकारी (Nodal Officer) संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे, यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या स्तरावरुन आपल्या अखत्यारीतील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या सर्व सुविधा केंद्र (Facilitation Centre-FC) व नोडल अधिकारी (Nodal Officer) यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
४. मे. फोर पिलर्स इन्फोटेक इंडिया प्रा.लि., ए-१०१, कुमार श्वास, बाणेर पाषाण लिंक रोड, एचडीएफसी बँकेजवळ, ओजस सोसायटी, पुणे-४११०२१, यांनी सदर प्रशिक्षणासाठी आवश्यक तांत्रिक बाबी, मनुष्यबळ व युजर मॅन्युअल इ. बाबींची व्यवस्था करावी.
५. मे. सिंथेसिस सोल्यूशन्स प्रा. लि., १४सी-२, श्री गणेश कृपा सोसायटी, लेन-१२, रामक्रिष्णानगर, पौड रोड, कोथरुड, पुणे-४११०३८, यांनी सदर प्रशिक्षणासाठी आवश्यक तांत्रिक बाबी, मनुष्यबळ व युजर मॅन्युअल इ. बाबींची व्यवस्था करावी.
६. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्रमांक ३, आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर परिपत्रक विभागात प्रकाशीत करण्याकरिता व सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यासाठी.